a-९५

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८**

**अ प्रभाग समिति**

**सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 02]**

**दिनांक : 12/01/2021** **वेळ : सकाळी 11.15 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर **2020 ची दिनांक १४/१२/२०२० रोजीची तहकूब** मासिक सभा मंगळवार दिनांक 12/**01/2021** रोजी सकाळी **11.15 वा.** अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह**" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 4. | मा.प्रमोद कुटे | सदस्य |
| 5. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 6. | मा. जयश्री वसंत गावडे | सदस्या |
| 7. | मा.कदम सुनिल मानसिंग | सदस्य |
| 8. | मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती सुचिता पानसरे- प्र. क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार-कार्यकारी अभियंता(स्थापत्य) मा.श्री शिवाजी लोखंडे-लेखाधिकारी,मा.श्री महादेव शिंदे-सहा.आरोग्याधिकारी,मा.शिवाजी चौरे-उपअभियंता(स्थापत्य), मा.श्री संजय खरात- उपअभियंता(स्थापत्य), मा. श्री. एस.पी.काळे-उपअभियंता (ड्रेनेज), मा.श्री डी.एम.कुंभार-उपअभियंता(पाणीपुरवठा) मा.श्री मोहन इश्वरा खोंद्रे-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य),मा.श्री आर.बी.जगताप-उपअभियंता (नगररचना) ,श्री नरोटे सुनिलदत्त्-उपअभियंता(उद्यान स्थापत्य), श्रीमती साळुंके ए.ए.-कनिष्ठ अभियंता(उद्यान स्थापत्य), श्री सगर पी.व्ही.-कनिष्ठ् अभियंता, श्री प्र.गो.कुंभार-कनिष्ठ् अभियंता(नगररचना), श्री मनोज शिंदे-मुख्य् लिपिक, श्री अहिवले ए.व्ही.--मुख्य् लिपिक(अतिक्रमण), श्री कोटीयाना डी.एम., आरोग्य् निरिक्षक(पशुवैद्यकिय) इ.पदाधिकारी/अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली. श्रीमती सुचिता पानसरे, यांची प्र.क्षेत्रिय अधिकारी या पदावर नव्यानेच नियुक्ती झाल्याने मा.उपमहापौर व मा.सभापती यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करणेत आला.

यानंतर बैठकीचे कामकाज सुरु करणेत आले.

**कार्यपत्रिका क्रमांक १२ दिनांक ११/०३/२०२० रोजी स.११.३० वा.झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**कार्यपत्रिका क्रमांक ०१ दिनांक ०९/१०/२०२० रोजी स.११.३० वा.झालेल्या अ प्रभाग समिती विशेष (सभापती निवड) सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.**

**विषय क्रमांक २:-** सन्मा.उपमहापौर केशव घोळवे यांचा दिनांक ११/१२/२०२० रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१० मधील के.एस.बी.चौक ते कुदळवाडी रोड या रस्त्याचे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

प्र.क्र.१० मधील संभाजीनगर येथील बर्ड व्हॅली शेजारील रिकाम्या भूखंडाचे प्रवेशद्वाराचे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

(कृ.मा.प.)

प-९८



ठराव क्रमांक 04
दिनांक 12/01/2021
सुचक: मा. शैलजा अविनाश मोरे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा. सदस्या शैलजा मोरे यांचा दिनांक १४/१२/२०२० रोजीचा प्रस्ताव.

वसंत विठ्ठल जोशी हे माजी सैनिक होते व देशाची २८ वर्षे सैनिक अधिकारी म्हणून सेवा करीत होते. तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमास त्यांचा मोठा हातभार होता. माजी सैनिक संघटनेच्या माध्यमातून सैनिकांच्या पेन्शन संदर्भातील व इतर आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी नेहमीच प्रयत्न् केला आणि वरील परिसरात गेली ३० वर्षापासून वास्तव्यास होते.

तरी से.नं.२७ अ, सुवर्णयुग तरुण मित्र मंडळ चौक ते कॅ.जी.एस. तथा दादासाहेब कदम मार्गावरील चौकास "श्री वसंत विठ्ठल जोशी(माजी सैनिक)" असे नाव देण्याचे प्रस्तावास मा.आयुक्त् यांचेकडील परिपत्रक क्र. भूजि/९/कावि/९/२०२० दिनांक ०२/०१/२०२० चे परिपत्रकास अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- शर्मिला राजू बाबर, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ शर्मिला राजू बाबर ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/ 04 /2021 दिनांक:- 18 /01/2021.

(सुचिता पानसरे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित -----------------------

**विषय क्रमांक ३:-** सन्मा.सदस्या सौ.शैलजा अविनाश मोरे यांचा यांचा दिनांक १४/१२/२०२० रोजीचा प्रस्ताव.
से.नं२७ अ, सुवर्णयुग तरुण मित्र मंडळ चौक ते कॅ.जी.एस.तथा दादासाहेब कदम मार्गावरील चौकाचे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.**

ठराव क्रमांक 02
दिनांक 12/01/2021
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा.सदस्य तुषार रघुनाथ हिंगे यांचे दिनांक ३/१२/२०२० रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील ६१.०० मी.रुंद रस्ता(मुंबई पुणे महामार्ग) ते विकास योजनेतील दाट वस्ती मधील ७.५ मिटर रुंद रस्ता यापर्यंत मौजे पिंपरी वाघेरे मधील सि.स.नं. ५७६६, ५७९२,५७९३,५७६५व ५७९४ या मिळकतीमधून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार २० फूट रुंदीचा प्रस्थापित करुन सदरचा रस्ता सार्वजनिक रस्ता घोषित करणेस व त्याबाबतची सर्व वैधानिक कार्यवाही करणेबाबचा प्रस्ताव रद्द करणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते रद्द /नामंजूर करणेत आला.

ठराव क्रमांक 03
दिनांक 12/01/2021
सुचक: मा. केशव घोळवे

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे

संदर्भ:- सन्मा. उपमहापौर केशव घोळवे यांचा दिनांक ११/१२/२०२० रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील के.एस.बी.चौक ते कुदळवाडी रोड या रस्त्याचे अद्याप नामकरण झालेले नाही. तरी के.एस.बी. चौक ते कुदळवाडी रोड या रस्त्याचे आझाद हिंद सेनानी "लालमणी मोतीराम जोशी" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मा.आयुक्त यांचेकडील क्रमांक भूजि/९/कावि/९/२०२० दिनांक ०२/०१/२०२० चे परिपत्रकास अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

प्रभाग क्रमांक १० मधील संभाजीनगर सिध्दीविनायक मंदिर बर्ड व्हॅली शेजारील रिकामा भूखंड आहे त्याचे प्रवेशद्वारावर "स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्रमांक भूजि/९/कावि/९/२०२० दिनांक ०२/०१/२०२० चे परिपत्रकास अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.